# १) घटक = आर्थिक नियोजन

भारतात १५मार्च १९५० रोजी नियोजन मंडळाची स्थापना.

१ एप्रिल १९५१ पासून आर्थिक नियोजनाद्वारे आर्थिक विकासात सुरुवात.

१ जाने २०१५ रोजी नियोजन मंडळाच्या जागी निती आयोगाची स्थापना.

## आर्थिक नियोजन म्हणजे काय?

नियोजन मंडळाची व्याख्या: पूर्वनिर्धारित सामाजिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी देशातील संसाधनांना संघटित करून त्यांचा महत्तम लाभकारक उपयोग करण्याच्या दृष्टीने अवलंबिण्यात येणारी पद्धती म्हणजे नियोजन होय.

**वैशिष्ट्ये:**
① मध्यवर्ती नियोजन सत्ता
② पाहणी
③ उद्दिष्टे
④ प्राधान्यक्रम व लक्ष्ये
⑤ संसाधनांची जुळवाजुळव
⑥ योजना कालावधी
⑦ मूल्यमापन
⑧ सतत चालणारी प्रक्रिया

## आर्थिक नियोजनाची आवश्यकता:

आर्थिक वाढ व उत्पन्न वितरणातील असमानता दूर करण्यासाठी योग्य अर्थव्यवस्थेचा स्वीकार

- समाजाची गरज लक्षात घेऊन उत्पादन कार्य
- साधन सामग्रीचा योग्य उपयोग
- व्यापार चक्रावर नियंत्रण
- जलद आर्थिक विकासासाठी
- संतुलित आर्थिक विकासासाठी.
- गळेकापू स्पर्धेचे उच्चाटन / वर्गसंघर्षाला पायबंद घालणेसाठी
- आर्थिक व सामाजिक विषमता दूर करण्यासाठी
- नैसर्गिक संसाधनाचा अपव्यय थांबविण्यासाठी
- रोजगार संधी निर्माण करणे, भांडवल निर्मिती दर वाढविणे, बेकारीचे निर्मूलन

## अ) नियोजनाचे प्रकार:

① आदेशाद्वारे – भारतामध्ये आढळते. बाजारव्यवस्थेत सरकार हस्तक्षेप करते. ~~मात्र सक्ती नसते~~.

② प्रलोभनाद्वारे – उद्योजकता, उत्पादन व उपभोगाचे स्वातंत्र्य. सरकारचा हस्तक्षेप पण सक्ती नसते.

③ सूचक – सरकारमार्फत खाजगी क्षेत्र कडकपणे नियंत्रित न करता विविध सोयी सवलती देवून देशाच्या विकासाची उद्दिष्टे साध्य करून घेण्याचा प्रयत्न - आठव्या योजनेपासून

i) वित्तीय नियोजन: वित्तीय नियोजन हे नियोजनाचे असे तंत्र असते ज्यामध्ये संसाधनाचे वितरण पैशाच्या स्वरूपात केले जाते - मागणी व पुरवठ्यातील असंतुलन दूर करण्यासाठी हे नियोजन फायद्याचे ठरते.

ii) भौतिक नियोजन: संसाधनांची तरतूद व्यक्ती, द्रव्य व यंत्रसामग्रीच्या स्वरूपात केली जाते. उदा, कच्चा माल, श्रमशक्ती यांच्या उपलब्धतेचा अंदाज. भौतिक नियोजनात पुढील बाबींशी संबंधित भौतिक लक्ष्ये ठरविली जातात.

① कृषी व औद्योगिक उत्पादन ② वाहतूक व दळणवळण सेवा ③ सामाजिक सेवा ④ रोजगार व उत्पन्न गुंतवणूकीचा स्तर - भौतिक नियोजनाकडे दीर्घकालीन नियोजन म्हणून

Scanned by CamScanner

दीर्घकालीन नियोजन व वार्षिक नियोजन :

⇒ दीर्घकालीन नियोजनात १५, २०, किंवा २५ वर्षांच्या कालावधीसाठी उद्दिष्ट्ये ही योजना ४/५/६ वर्षांच्या अल्पकालीन योजनांमध्ये विभाजित केली जाते.

⇒ वार्षिक नियोजन हे दीर्घकालीन योजनेचाच एक भाग असून एका वर्षात साध्य करावयाच्या उद्दिष्टपूर्तीच्या संदर्भात असते.

पूर्णत्ववादी नियोजन व लोकशाहीवादी नियोजन :

⇒ पूर्णत्ववादी नियोजनामध्ये एकाच योजनेच्या आधारे सर्व आर्थिक क्रियांचे नियंत्रण व दिशादर्शन केंद्रिय प्राधिकरणामार्फत केले जाते.
सरकारमार्फत उपभोग, उत्पादन, विनिमय व वितरणाचे नियंत्रण.

⇒ लोकशाहीवादी नियोजनात सर्व टप्प्यात लोक, विविध संस्था, स्वयंसेवी संस्थांचा समावेश करून लोकांना सामाजिक, राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य

सरकती योजना व निश्चित योजना :

⇒ सरकती ⇒ प्रत्येक वर्षी ३ योजना — पहिली योजना - वार्षिक (अर्थसंकल्प)
दुसरी योजना ३/४/५ वर्षांची - मध्यमकालीन
तिसरी योजना १०/१५/२० " - दीर्घकालीन

वार्षिक योजना मध्यमकालीन योजनेचा तर मध्यम कालीन योजना दीर्घकालीन योजनेचा भाग.

⇒ निश्चित योजना : ४/५/६/किंवा ७ वर्षांची एक निश्चित योजना - निश्चित उद्दिष्ट्ये
निश्चित कालावधीसाठी - कालावधीनंतर योजना संपुष्टात.

केंद्रित व विकेंद्रित योजना :

केंद्रित ⇒ एकाच केंद्रिय प्राधिकरणामार्फत राबवली जाते. त्यामुळे ताठर, आर्थिक स्वातंत्र्याचा अभाव. — दिशा वरून खाली (Directed from the Above)

विकेंद्रित ⇒ दिशा खालून वर (From below) - विविध प्रशासकीय एककांशी सल्ला मसलत करून (राज्ये, जिल्हे) - केंद्राच्या योजनेबरोबरच राज्याच्या योजनांचा समावेश. तसेच जिल्हा/गाव पातळीच्या योजनांचा विचार

## ✳ भारताची मिश्र अर्थव्यवस्था ✳

⇒ खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व

⇒ भारतीय मिश्र अर्थव्यवस्था भांडवलशाहीच्या आराखड्यात कार्य करणारी.

⇒ चार क्षेत्रे : 1) सार्वजनिक
2) खाजगी
3) संयुक्त
4) सहकारी.

Scanned by CamScanner

# ५ * भारतातील आर्थिक नियोजन *

३/६

* १९३० चे दशक : राष्ट्रवादी नेत्यावर समाजवादाचा वाढता प्रभाव.
* १९३४ : एम. विश्वेश्वरय्या (म्हैसूर संस्थानचे दिवाण) यांनी आपल्या 'Planned Economy for India' या ग्रंथात सर्वप्रथम नियोजनाची संकल्पना मांडली. त्यांनी १० वर्षांची योजना मांडली 'नियोजन करा किंवा नष्ट व्हा' (Plan or Perish) असा संदेश दिला.
* १९३८ : काँग्रेसच्या हरिपुरा अधिवेशनात (अध्यक्ष-सुभाषचंद्र बोस) पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय नियोजन समितीची' स्थापना.
* १९४४ : मुंबईतील आठ उद्योगपतींनी (जे.आर.डी. टाटा, पुरुषोत्तम ठाकूरदास) भांडवलवादाच्या आधारावर 'मुंबई योजना' (Bombay Plan) तयार केली. तिला टाटा-बिर्ला योजना असेही म्हणतात. १० ते १५ वर्षांच्या कालावधीत राष्ट्रीय उत्पन्नात तिप्पट व प्रति व्यक्ती उत्पन्नात दुप्पट वाढ घडवून आणणे हे उद्दिष्ट होते. या योजनेने भारतात सर्वप्रथम मिश्र अर्थव्यवस्थेची संकल्पना मांडली.
* १९४४ - श्री श्रीमान नारायण अग्रवाल यांनी गांधीजींच्या आर्थिक विचारावर आधारित 'गांधी योजना' तयार केली.
* १९४५ एप्रिल. मुंबई योजनेला उत्तर म्हणून मानवेंद्रनाथ रॉय यांनी जनता योजना तयार केली. या तिन्ही योजनांची अंमलबजावणी होवू शकली नाही.
* १९५० जाने. जयप्रकाश नारायण - यांनी सर्वोदय योजना तयार केली. अहिंसात्मक पद्धतीने शोषणविरहीत समाज निर्माण करणे हे उद्दिष्ट.
* १९५० जाने. कोलंबो येथे झालेल्या गुटांच्या संमेलनात - 'कोलंबो योजना'.

## * नियोजन मंडळ * (Planning Commission)

स्थापना : १५ मार्च १९५० - तत्कालीन सरकारच्या अधिनियमाने.
१९६७ - शासनाचा भाग बनले.

स्वरूप : १) असंवैधानिक / घटनाबाह्य - घटनेत उल्लेख नाही.
२) अवैधानिक / कायदाबाह्य - स्थापना कायद्याने करण्यात आलेली नाही.
३) सल्लागार मंडळ.

रचना : - निश्चित नाही - पंतप्रधान कार्यालयाच्या अधिनस्थ कार्य करते.
i) अध्यक्ष - पंतप्रधान
ii) उपाध्यक्ष - पूर्णवेळ काम करणारे सदस्य
iii) काही कॅबिनेट मंत्री
iv) काही अर्थतज्ञ.

कार्ये - १) संसाधनांचा शोध घेणे - पंचवार्षिक योजना तयार करणे.
२) नियोजनाचे टप्पे ठरवणे
३) अडथळे सुचित करणे
४) योजनेचे परिक्षण करून बदल सुचविणे.

Scanned by CamScanner

# * राष्ट्रीय विकास परिषद *. (National Development Council)

स्थापना : ६ ऑगस्ट १९५२ - तत्कालीन सरकारने अधिनियमाने.

गरज : पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या प्रक्रियेत घटकराज्यांना सहभागी करुन घेण्यासाठी

स्वरूप : १) असंवैधानिक
२) अवैधानिक.
३) आर्थिक नियोजन संदर्भात धोरण तयार करणारी सर्वोच्च संस्था

रचना : १९६७ च्या आधी परिषदेत फक्त पंतप्रधान व राज्यांचे मुख्यमंत्री यांचा समावेश. १९६७ पासून पुढील सदस्य
i) पंतप्रधान - परिषदेचे अध्यक्ष
ii) सर्व केंद्रिय कॅबिनेट मंत्री
iii) घटक राज्यांचे मुख्यमंत्री
iv) केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक
v) नियोजन मंडळाचे सर्व सदस्य

वर्षातून NDC च्या किमान दोन सभा होणे अपेक्षित.

कार्य : १) नियोजन मंडळाने तयार केलेल्या पंचवार्षिक योजनेच्या अंतिम आराखड्याला मान्यता देणे.
→ परंतू योजनेला अंतिम मान्यता (संसदेची)
ii) वेळोवेळी परीक्षण व मूल्यांकन करणे.

## * पंचवार्षिक योजना तयार करण्याची व्यवस्था : *

⇒ लोकशाही विकेंद्रित पद्धतीने ⇒ १) राष्ट्र २) राज्य ३) जिल्हा.

⇒ राष्ट्रपातळीवरील व्यवस्था : ① नियोजन मंडळ
② राष्ट्रीय विकास परिषद

⇒ राज्यस्तरीय यंत्रणा : ⇒ राज्य स्तरावर राज्य नियोजन मंडळाची निर्मिती.
⇒ राज्याचे मुख्यमंत्री — पदसिद्ध अध्यक्ष
⇒ एक उपाध्यक्ष
⇒ काही कॅबिनेट मंत्री व तांत्रिक तज्ज्ञ.

## महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळ :

⇒ स्थापना - १९७२ → १९९५ साली पुनर्घटन.
⇒ नियोजन विभागाच्या अधिनस्थ

सध्याची रचना ⇒ १) अध्यक्ष - मुख्यमंत्री (पदसिद्ध)
२) कार्यकारी अध्यक्ष
३) सदस्य - वित्त व नियोजन मंत्री, आदिवासी विकास मंत्री, नियोजन राज्यमंत्री, तिन्ही वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष
४) अशासकीय सदस्य = अर्थकारण, बँकिंग, कृषी, उद्योग व उर्जा, नगर विकास आदिवासी कल्याण, शिक्षण, आरोग्य क्षेत्र - ६ तज्ञ व्यक्ती
५) महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव, आदिवासी विभागाचे सचिव

Scanned by CamScanner

६) सदस्य सचिव: नियोजन विभागाचे प्रधान सचिव.

## जिल्हा स्तरिय यंत्रणा :

⇒ घटनेच्या ७४व्या घटनादुरुस्तीने जिल्ह्यातील नियोजन यंत्रणेला घटनात्मक दर्जा.

⇒ २४३ ZD कलम नव्याने समाविष्ट - त्यानुसार जिल्हा नियोजन समितीची स्थापना

कार्य ⇒ सर्व पंचायत संस्था व नगरपरिषदांच्या योजना एकत्रित करून जिल्हा विकास योजनेचा मसुदा तयार करणे. व तो राज्य सरकारला सादर करणे.

⇒ महाराष्ट्रात १९७२ पासूनच प्रत्येक जिल्ह्यामध्ये 'जिल्हा नियोजन व विकास मंडळ' नावाने समित्या स्थापन. - २४३ZD अन्वये त्याचे रुपांतर जिल्हा नियोजन समितीत.

⇒ त्यासाठी १९९८ मध्ये महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (स्थापना व कार्ये) अधिनियम १९९८ संमत - १५ मार्च १९९९ पासून कार्यान्वित. मात्र जिल्हा नियोजन समित्या २००६ मध्येच स्थापन होवू शकल्या.

## रचना :

अ) सदस्य संख्या ⇒ जिल्ह्याची लोकसंख्या २० लाखापेक्षा कमी असल्यास - ३० सदस्य
२० ते ३० लाख - ४० सदस्य
३० लाखापेक्षा जास्त - ५० सदस्य
पैकी ४/५ सदस्य निर्वाचित

ब) पदसिद्ध सदस्य ⇒ अध्यक्ष - जिल्ह्याचे पालक मंत्री
सदस्य - जि.प. अध्यक्ष
सचिव - जिल्हाधिकारी

क) नियुक्त ⇒ i) सहसदस्य: जिल्ह्यातून निवडून आलेल्या मंत्र्यांपैकी कमाल ६ मंत्री. - (नियुक्ती - राज्यशासनामार्फत)

ii) सदस्य: राज्यपालामार्फत प्रत्येक वैधानिक विकास मंडळाचा एक प्रतिनिधी सदस्य म्हणून.

iii) —॥— राज्यशासनामार्फत राज्य विधिमंडळ व संसद सदस्यातून दोन सदस्य (आमदार/खासदार)

iv) —॥— राज्यशासनामार्फत जिल्हा नियोजनाचे ज्ञान असलेले २ सदस्य (४० सदस्यांच्या) तर ४ सदस्य (५० सदस्यांच्या) समितीवर

ड) विशेष आमंत्रित सदस्य:
i) जिल्ह्याचे विभागीय आयुक्त
ii) —॥— CEO
iii) जिल्हा नियोजन अधिकारी
iv) राज्य नि.म.चे कार्यकारी अध्यक्ष किंवा सदस्य.

कलम २४३ ZE द्वारे प्रत्येक महानगरासाठी 'महानगर नियोजन समितीची' स्थापना.
जून २००१ सर्वप्रथम कोलकाता येथे —॥—
महाराष्ट्र सरकारने १९९९ मध्ये महानगर नियोजन समिती (स्थापना व कार्ये) अधिनियम १९९९ - संमत केला

Scanned by CamScanner

# भारतातील पंचवार्षिक योजना :

⇒ १ एप्रिल १९५१ पासून आर्थिक नियोजनास सुरुवात. तेव्हापासून पंचवार्षिक योजनांची श्रुंखला.
तेव्हापासून ११ योजना पूर्ण. १२वी योजना - २०१२ - २०१७.

⇒ त्या व्यतिरिक्त ७ वार्षिक योजना.

⇒ योजना प्रक्रियेत तीनदा खंड.

पहिला खंड - १९६६-६९ दरम्यान - ३ वर्षे
दुसरा खंड - १९७८-८० दरम्यान - २ वर्षे } ७ वर्षे
तिसरा खंड - १९९०-९२ दरम्यान - २ वर्षे

⇒ १ एप्रिल १९५१ पासून १९८५ पर्यंत — आदेशात्मक
परिस्थिती ७ व्या योजनेत (८५-९०) विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सूचक नियोजनप्रणाली
७ व्या योजनेत जवाहर रोजगार योजनेच्या स्वरूपात भारताची पहिली विकेंद्रित यो
८ व्या योजनेला पहिली पूर्ण सूचक नियोजनाची योजना मानली जाते.

## पहिली पंचवार्षिक योजना :

कालावधी ⇒ १ एप्रिल १९५१ ते ३१ मार्च १९५६
मुख्य भर ⇒ कृषी क्षेत्रावर
प्रतिमान ⇒ हेरॉल्ड डोमर
खर्च ⇒ प्रस्तावित २३७८ कोटी - वास्तविक - १९६० रु.
उपनाव ⇒ पुनरुत्थान योजना.

उद्दिष्टे : i) अर्थव्यवस्थेत समतोल साधणे.
ii) साधनसामग्रीचा अधिकाधिक वापर, रोजगारनिर्मिती, राहणीमान दर्जा उंचाव
iii) चलन फुगवट्यावर नियंत्रण.

हाती घेण्यात आलेले प्रकल्प : i) दामोदर खोरे विकास योजना (झारखंड - प. बंगाल)
ii) भाक्रा - नानगल प्रकल्प (सतलज - हि.प्र / पंजाब)
iii) कोसी प्रकल्प (कोसी - बिहार)
iv) हिराकुड योजना (महानदी - ओरिसा)
सर्व प्रकल्पांची आखणी अमेरिकेतील टेनेसी खोरे प्रकल्पाच्या धर्तीवर
v) सिंद्री - झारखंड येथे - खत कारखाना
vi) चित्तरंजन - रेल्वे इंजिनाचा कारखाना
vii) पेरांबूर - रेल्वे डब्यांचा कारखाना
viii) HMT - बेंगलोर
ix) हिंदुस्थान ॲन्टीबायोटिक - पिंपरी-पुणे.
x) १९५२ - समुदाय विकास कार्यक्रम.

विशेष घटनाक्रम - 1) ८ मे १९५२ - औद्योगिक विकास व नियमन अधिनियम १९५१ लागू
उद्देश १९४८ च्या औद्योगिक धोरणाच्या तरतुदींना संरक्षण प्रदान
2) २ ऑक्टो ५२ - समुदाय विकास कार्यक्रमाची रुपरेषा (Community Develop Programme - CPD) उद्देश - ग्रामीण भागात कृषी, पशुपाल

Scanned by CamScanner

ग्रामोद्योग, स्वास्थ्य व उपचार आणि बालकल्याण क्षेत्रात सुधारणा करणे.
द्वितीयक उद्देश देशात सार्वजनिक मालमत्तेची निर्मिती करणे.

3) हातमाग उद्योग विकासासाठी १९५२ मध्ये अखिल भारतीय हातमाग बोर्डाची स्थापना.
१९५३ मध्ये- अखिल भारतीय खादी व ग्रामोद्योग बोर्डाची स्थापना.

4) १९५५ - अखिल भारतीय ग्रामीण पतपाहणी समितीच्या शिफारशीनुसार (गोरवाला समिती) इंपिरियल बँकेचे रुपांतर SBI मध्ये रुपांतर.

5) जानेवारी १९५५ मध्ये भारतीय औद्योगिक पत आणि गुंतवणूक महामंडळ (ICICI) स्थापन करण्यात आले- कार्य सुरु - मार्च १९५५

मूल्यमापन:
1) योजना - यशस्वी - i) मान्सून अनकुल ii) लक्ष्ये कमी.
2) अन्नधान्य उत्पादन: ५२.२ दशलक्ष टनावरुन (१९५१-५२) ६५.८ दशलक्ष टनापर्यंत (५५-५६)
3) आर्थिक वाढीचा दर: संकल्पित - २.१% साध्य ३.६%.
4) राष्ट्रीय उत्पन्न १८% नी तर दरडोई उत्पन्न ११% नी वाढले.
5) एकमेव योजना की जिच्यात किंमतीचा निर्देशांक १३%. नी कमी झाला.

## दुसरी पंचवार्षिक योजना.

कालावधी ⇒ १ एप्रिल १९५६ ते ३१ मार्च १९६१
भर ⇒ जड व मुलभूत उद्योग
प्रतिमान ⇒ पी.सी. महालनोबीस - रशियातील फेल्डमनच्या सोविएट प्रतिमानावर आधारित - औद्योगिकरणावर भर. (याला पर्याय म्हणून ब्रम्हानंद आणि वकील यांनी 'मजूरी वस्तू प्रतिमान' जाहिर केले त्यांच्या मते भांडवली वस्तूंपेक्षा उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनावर जास्त लक्ष द्यावे जेणेकरुन रोजगार निर्मिती होईल)
हे प्रतिमान स्विकारले नाही.
उपनाव - नेहरु-महालनोबीस योजना (भौतिकवादी योजना)
खर्च - प्रस्तावित - ४८०० कोटी वास्तविक - ४६०० कोटी.

उद्दिष्ट्ये:
1) विकास दर ७.५ प्रतिवर्ष एवढा संपादन करणे.
2) औद्योगिकरण
3) १० ते १२ लाख व्यक्तींना नव्याने रोजगार
5) समाजवादी समाजरचनेचे तत्व. (स्वीकार - कॉंग्रेसचे आवडी अधिवेशन १९५५)

हाती घेण्यात आलेले प्रकल्प:
1) भिलाई पोलाद प्रकल्प - (रशियाच्या मदतीने - १९५९)
2) रुरकेला —॥— (प. जर्मनी —॥— —॥—)
3) दुर्गापूर —॥— (ब्रिटन १९६२)
4) BHEL - (Bharat Heavy Electricals Ltd) - भोपाळ
5) खत कारखाने (नानगल, रुरकेला)

Scanned by CamScanner

घटनाक्रम : 1) दुसरे औद्योगिक धोरण : ३० एप्रिल १९५६ - उद्योगांचे विभागण ३ अनुसूचीमध्ये. - समाजवादी समाजरचना स्थापन करण्याचे लक्ष्य.

2) खादी व ग्रामोद्योग कार्यक्रम - १९५७-५८

3) सघन कृषी जिल्हा कार्यक्रम १९६०-६१ (IADP)

मूल्यमापन :

i) वाढीचा दर - ४.२१% संपादित.

ii) पोलाद उद्योगात विशेष वाढ

iii) शिक्षण व आरोग्य सेवांत वाढ

iv) समाजवादी - उद्दिष्ट गाठण्यात अपयश.

v) खालील प्रश्न - i) सुवेझ कालवा प्रश्न ii) मोसमी पावसाची कमतरता iii) परकीय चलन साठ्यातील घट

vi) किंमतीचा निर्देशांक ३०% नी वाढला.

## तिसरी पंचवार्षिक योजना :

कालावधी ⇒ १ एप्रिल १९६१ ते ३१ मार्च १९६६

भर ⇒ कृषी व मूलभूत उद्योग - १९६२ च्या चीन युद्धानंतर भर (संरक्षण व विकास)

प्रतिमान ⇒ सुखमॉय चक्रवर्ती यांच्या मॉडेलवर आधारित.

खर्च ⇒ प्रस्तावित ७५०० कोटी - प्रत्यक्षात ८५७७ कोटी.

उद्दिष्ट्ये 1) वाढ लक्ष्य दर - ५.६%.

2) स्वावलंबी व स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेची निर्मिती

3) रोजगार निर्मिती

4) संधींची समानता.

घडलेल्या घटना : i) १९६२ - भारत - चीन युद्ध

ii) १९६५ भारत - पाक युद्ध

iii) १९६५-६६ - भीषण दुष्काळ.

घटनाक्रम : 1) खाद्य समस्येच्या समाधानासाठी १९६४-६५ - सघन कृषी क्षेत्र कार्यक्रम IA...

2) १९६५ - कृषी मूल्य आयोगाची स्थापना - प्रो. दांतवाला अध्यक्ष - सुरुवातीला ३ वर्षांसाठी पुढे कायमस्वरूपी - १९८५ साली नाव - कृषी मूल्य व किंमत आयो...

3) १९६५ - भारतीय अन्न महामंडळ - (FCI) ची स्थापना - अन्नधान्याचा बफर स्टॉक करण्यात आला.

4) १९६४ - IDBI तसेच UTI ची स्थापना.

मूल्यमापन : 1) सर्वाधिक अपयशी योजना (युद्धे, दुष्काळ)

2) कृषी उत्पादन ८२ दशलक्ष टनावरून ७२ दशलक्ष टनापर्यंत

3) १९६६-६७ - राष्ट्रीय उत्पन्न ४.२% नी कमी झाले.

Scanned by CamScanner

प्रतिव्यक्ती उत्पन्नाच्या वाढीचा दर ऋणात्मक
4) अर्थव्यवस्था दिवाळखोर बनली : भारताला मदतीसाठी IMF कडे जावे लागले.
१९६६मध्ये रुपयाचे ३६.५% नी अवमूल्यन.

## योजनेला सुट्टी Plan Holiday

→ चौथी योजना सुरू करण्यात आली नाही कारण.
i) आर्थिक अस्थैर्य
ii) औद्योगिक क्षेत्रात शिथिलता
iii) वित्तिय संसाधनांचा अभाव.

या कालखंडास योजनेला सुट्टी किंवा योजना अवकाश म्हणतात.
कालावधी - १ एप्रिल १९६६ ते ३१ मार्च १९६९ या दरम्यान ३ वार्षिक योजना राबविल्या.
① १९६६-६७ ② १९६७-६८ ③ १९६८-६९.

भर ⟹ स्वावलंबन

① पहिली वार्षिक योजना - १९६६-६७.
⇒ अजून एका दुष्काळाला सामोरे जावे लागले.
⇒ १९६६च्या खरिप हंगामात हरित क्रांतीच्या तंत्रज्ञानाचा अवलंब.
⇒ १९६६ — ३६.५% रुपयाचे अवमूल्यन.

② दुसरी वार्षिक योजना : १९६७-६८.
⇒ उत्पादनात वाढ (हरितक्रांती, पुरेसा मान्सून)
६७-६८ मध्ये अन्नधान्याचे उच्चांकी उत्पादन.

③ तिसरी वार्षिक योजना १९६८-६९
⇒ उत्पादन व किंमती स्थिर.
⇒ व्यवहारतोलात सुधारणा.

## चौथी पंचवार्षिक योजना

कालावधी १ एप्रिल १९६९ ते ३१ मार्च १९७४
मुख्य भर - स्वावलंबन
घोषवाक्य - स्थैर्यासह आर्थिक वाढ.
घोषणा - गरिबी हटाव.
प्रतिमान - ॲलन मान आणि रुद्र यांनी तयार केलेले खुले सातत्य प्रतिमानावर आधारित ४ थ्या योजनेचा आराखडा धनंजयराव गाडगीळ यांनी तयार केला.
उपनाव - गाडगीळ योजना.

उद्दिष्ट : १) स्वावलंबन २) सामाजिक न्यायासह आर्थिक वाढ ३) समतोल प्रादेशिक
योजना खर्च : प्रस्तावित खर्च : १५९०० कोटी रु. वास्तविक खर्च : १५७७९ कोटी.
सुरु करण्यात आलेले कार्यक्रम :
१९७३ ⇒ अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम (DPAP)
१९७४-७५ ⇒ लघु शेतकरी विकास अभिकरण (SFDA)
१९७२ ⇒ बोकारो पोलाद प्रकल्प.
१९७३ ⇒ SAIL- (Steel Authority of India)

विशेष घटनाक्रम :
1) जून १९६९ MRTP-act-1969 कायदा संमत.
2) जुलै ६९- १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण
3) १९६९- च्या शेवटी नरिमन समितीच्या शिफारशीनुसार अग्रणी बँक योजना सुरु
4) १९७२- साधारण विमा व्यवसायाचा कायदा संमत करून १ जाने १९७३ भारतीय साधारण विमा महामंडळाची स्थापना करण्यात आली.
5) १९७२-७३ पहिल्यांदा भारताचा व्यापार तोल अनुकूल ठरला.
6) १९७३ - परकीय चलन विनिमय कायदा (FERA) 1973 - संमत.
7) १९७३-७४ मध्ये प्रथमच दारिद्र्य रेषेचे मोजमाप कॅलरीच्या स्वरुपात.

मूल्यमापन
i) पहिल्या दोन वर्षात प्रगती नंतर अपयशे.
ii) १९७१ - भारत-पाक युद्ध - बांग्लादेश निर्वासितांचा प्रश्न.
iii) १९७३ .. पहिला तेलाचा झटका, तेलाच्या जागतिक किंमतीत ४००% वाढ.
→ iv)

## पाचवी पंचवार्षिक योजना

कालावधी - १ एप्रिल १९७४ ते ३१ मार्च १९७९ - मात्र १९७८ मध्येच संपुष्टात.
मुख्य भर = गरिबी हटाओ / दारिद्र्य निर्मुलन व स्वावलंबन.
= कल दारिद्र्यनिर्मुलनाकडे
प्रतिमान = ॲलन मान व अशोक रुद्र यांच्या प्रतिमानावर आधारित - आराखडा डी.डी. धर
उद्दिष्ट्ये ⟶ ① आर्थिक वाढ - लक्ष्य दर ४.४%
② दारिद्र्य निर्मुलन
③ उत्पादक रोजगारात वाढ.
योजना खर्च - प्रस्तावित ३७२५० कोटी - वास्तविक - ३९४२६ कोटी.
सुरु करण्यात आलेले कार्यक्रम : ① TRYSEM -
② किमान गरजांचा कार्यक्रम. i) BPL कुटुंबांना मोफत व अनुदानित सेवा. ii) ग्रामीण व शहरी कामगारांची कार्यक्षमता वाढविणे.

**विशेष घटनाक्रम :** १) २ ऑक्टो १९७५ - ५ प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना.
२) १९७६-७७ - दुसऱ्यांदा व्यापारतोल अनुकूल.
३) पहिले राष्ट्रीय लोकसंख्या धोरण जाहीर
४) १९७५-७६ – बालकल्याणासाठी एकात्मिक बाल विकास योजना (ICDS)
५) १९७७-७८ – वाळवंट विकास कार्यक्रम (DDP)

**मुल्यमापन**
i) सुरुवातीस तेलाचा झटका, चलन फुगवटा.
ii) दारिद्र्य निर्मुलन, बेरोजगारी व स्वावलंबन क्षेत्रात अपयश.

या कालावधीतील राजकीय घटना :
i) २५ जून १९७५ - आणीबाणी - निवडरी
ii) २६ जून १९७५ - २० कलमी कार्यक्रम
iii) मार्च १९७७ - जनता पार्टीचे सरकार
iv) मार्च १९७८ - पाचवी योजना संपुष्टात
v) १ एप्रिल १९७८ – जनता पार्टीची स्वत:ची सहावी योजना (सरकती योजना) सुरु.
vi) जाने १९८० – कॉंग्रेस (I) पुन्हा सत्तेवर - सरकती योजना फेटाळली.
vii) १ एप्रिल १९८० – नवीन सहावी योजना - (१९८०-८५) सुरु.

**जनता पार्टीची सहावी योजना**

⇒ कालावधी - १९७८-१९८३ मात्र १ एप्रिल १९७८ ते जाने १९८० दरम्यान
⇒ या योजनेला Rolling-Plan किंवा सरकती योजना किंवा सावली योजना.
⇒ Rolling Plan - वैज्ञानिक रुपात मांडण्याचे श्रेय – प्रो. गुन्नार मिर्डल
⇒ योजना तत्कालिन नियोजन आयोगाचे अध्याध्यक्ष लकडावाला यांनी तयार केली.

योजनेचा भर : i) कृषी व संलग्न क्षेत्रामध्ये रोजगार क्षमता वाढविणे.
ii) लघु व कुटीर उद्योगावर.

सुरु करण्यात आलेले कार्यक्रम →
i) Food for work - कामाच्या बदल्यात अन्न - देशपातळीवरील रोजगारासाठी असलेली पहिली योजना.
ii) अंत्योदय योजना : गरिबातील गरिब ५ कुटुंबांना (१८वर्षातील) जीवनावश्यक सेवा पुरविणे.
iii) जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना.

Scanned by CamScanner

# सहावी पंचवार्षिक योजना

कालावधी : १ एप्रिल १९८० ते ३१ मार्च १९८५

भर ⇒ दारिद्र्य निर्मुलन व रोजगार निर्मिती

प्रतिमान ⇒ ॲलन मानव अशोक रुद्र

उद्दिष्ट्ये ⇒ १) ५.२ टक्के वृद्धी दर
२) ३ कोटी ४० लक्ष रोजगार निर्मिती
३) आर्थिक व तांत्रिक स्वावलंबन

खर्च ⇒ प्रस्तावित - ९७५०० कोटी वास्तविक १,०९,२९२ कोटी.

सुरु करण्यात आलेले कार्यक्रम :

१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम - IRDP. २ ऑक्टो १९८०
२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम - NREP. —॥—
३) ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना - RLEGP. १५ ऑ १९८३
४) ग्रामीण भागातील महिला व मुलांचा विकास (Development of Women & Chil.. in Rural area - सप्टें १९८२ - डेन्मार्कच्या मदतीने DWCRA
५) नवीन २० कलमी कार्यक्रम - मूळच्या कार्यक्रमात बदल करून १४ जाने १९८२ रोजी.
६) दोन नवीन प्रकल्प - विशाखापट्टणम् पोलाद प्रकल्प - (आंध्र प्र)
सालेम पोलाद प्रकल्प (ता.नाडू)

## विशेष घडामोडी

१) १५ एप्रिल १९८० - ६ बँकांचे राष्ट्रीयीकरण
२) जाने १९८२ - एक्झीम बँक ऑफ इंडिया } स्थापना
नाबार्ड.
३) देशास अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण घोषित करण्यात आले.

मूल्यमापन : - योजना यशस्वी - (सर्वाधिक)
— वाढीचा दर ५% पेक्षा अधिक ठेवण्यास यश.

# सातवी पंचवार्षिक योजना

कालावधी ८५ ते ९० (१५ वर्षाच्या दिर्घकालीन योजनेचा भाग)

घोषवाक्य ⇒ ' अन्न, रोजगार, उत्पादकता '

घोषणा ⇒ १९८८ मध्ये कॉंग्रेसने वार्षिक अधिवेशनात 'गरिबी हटाओ' ची घोषणा.

भर ⇒ उत्पादक रोजगार निर्मिती (रोजगारनिर्मिती जनक योजना) म्हणतात.

प्रतिमान - ब्रह्मानंद व वकील - मजुरी वस्तू प्रतिमान.
उपभोग्य वस्तू उत्पादनावर भर.

खर्च - प्रस्तावित - १,८०,००० कोटी वास्तविक २,१८,७२९ कोटी.

Scanned by CamScanner

सुरु करण्यात आलेल्या योजना ·

१) इंदिरा आवास योजना - ८५-८६ ·
एप्रील १९८९ पासून JRY मध्ये वर्ग व १९९६ पासून स्वतंत्र दर्जा ·

२) दशलक्ष विहिर योजना - NREP चा भाग म्हणून १९८८-८९ पासून ·
मात्र १९८९ पासून JRY मध्ये ·

३) पुनर्घटित २० कलमी कार्यक्रम - १९८६ मध्ये १ एप्रिल ८७ पासून अंमलबजावणी

४) १९८६-८७ मध्ये ग्रामीण भागाचा समुचित विकास व तेथे आर्थिक घडामोडींना प्रोत्साहन देण्यासाठी (Council for advancement of People's action & Rural Technology CAPART)

५) जवाहर रोजगार योजना - - NREP व RLEGP एकत्रिकरण करुन

मूल्यमापन : -१) सुधारणा घडल्या
२) BPL प्रमाण ३८ %. वरुन (८३-८४) ३०% (१९८७) कमी झाले ·

## वार्षिक योजना (१९९०-९२)

१) १९९०-९१ }
२) १९९१-९२ } देशातील राजकीय तसेच आर्थिक अस्थैर्य ·

→ संकटे - १) व्यवहारतोलाचे संकट
२) परकीय चलनाचा अत्यल्प साठा ·
३) वाढती राजकोषिय तूट
४) चलनवाढीचा मोठा दर (१९९१-९२ - वार्षिक १३.८% दर)
५) आर्थिक वाढीचा दर १९९१-९२ ⇒ ०.९% ·

→ १) जुलै १९९१ मध्ये रुपयांचे अवमुल्यन

## आठवी पंचवार्षिक योजना -

कालावधी ⇒ १९९२ ते १९९७

मुख्य भर ⇒ मानवी विकास व मनुष्यबळ विकास

प्रतिमान ⇒ आठव्या योजनेपासून पूर्णपणे सूचक नियोजनाचा वापर
- राव-मनमोहन प्रतिमान म्हणतात ·
- LPG किंवा खाउजा प्रतिमान असेही म्हणतात · हे प्रतिमान जॉन डब्ल्यूमिलर प्रतिमानावर आधारित ·
- निर्यातप्रधान आर्थिक वृद्धीचे प्रतिमान ·
- प्रस्तावित खर्च - ४,३४,१०० कोटी   वास्तविक ४,८५,४५७ कोटी ·

उद्दिष्ट्ये : १) रोजगाराच्या संधी
२) लोकसंख्या वाढीवर नियंत्रण
३) १५ ते ३५ वयोगटातील - निरक्षरतेचे संपूर्ण उच्चाटन.
४) स्वच्छ पिण्याचे पाणी.
५) आरोग्यसुविधा
६) कृषी क्षेत्राचा विकास.
७) ऊर्जा, वाहतुक, दळणवळण सुविधा.

विशेष घटनाक्रम ⇒

① १९९१ मध्ये पहिल्यांदा सार्वजनिक क्षेत्रात निर्गुंतवणूकीची प्रक्रिया.
ऑगस्ट १९९६ - जी.वी. रामकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली 'निर्गुंतवणूक आयोगाची' स्थापना.

② १९९२-९३ - रुपया व्यापार खात्यावर आंशिक परिवर्तनीय
९३-९४ - व्यापार खात्यावर पूर्णत: परिवर्तनीय
९४-९५ - चालू खात्यावर पूर्ण परिवर्तनीय.

③ १९९२ - सेबीला सवैधानिक दर्जा.
④ १९९२ - ७३ व ७४ व्या घटनादुरुस्ती - पंचायत राज व्यवस्थेस वैधानिक दर्जा.
⑤ १९९३-९४ - खाजगी क्षेत्रात बँक स्थापन करण्यास परवानगी.
⑥ १९९६ - डिपॉझिटरी प्रणाली (NSDL व CDSL) स्थापना.
९६ - NSDL च्या माध्यमातून Paperless trading ची सुरुवात.

सुरु करण्यात आलेल्या योजना :

① राष्ट्रीय महिला कोष - १९९२-९३ - असंघटित क्षेत्रातील निर्धन महिलांच्या वित्तीय गरजा पूर्ण करणे
महिला व बालविकास राज्य मंत्री या कोषाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात.
② २ ऑक्टो १९९३ - तीन नवीन योजना :
① आश्वासित रोजगार योजना (Employment Assurance Scheme)
② पंतप्रधान रोजगार योजना (PMRY)
③ महिला समृद्धी योजना (MSY) - बचतीची प्रवृत्ती वाढीस लागावी
③ २३ डिसें १९९३ - खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना. (MPLADS)
(Member of Parliament Local Area Development Scheme)
④ १५ ऑ. ९५ -
① राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना : (NSAP - National Social Assistance Program)
② मध्यान्ह आहार योजना (MDM) Mid-day meal Scheme)
③ इंदिरा महिला योजना (IMY)
⑤ संगम योजना - १५ ऑ. १९९६ - अपंग व्यक्तींचे गट करून - गटांना १५ हजार सहाय्य
⑥ गंगा कल्याण योजना (GKY) - भूपृष्ठजल व भूजल - विकासासाठी वित्तीय मदत

Scanned by CamScanner

मूल्यमापन : १) वाढीचा दर - लक्ष्य ५.५% प्रत्यक्षात ६.६८%.
२) कृषी व उद्योग व सेवा क्षेत्रात वाढ.

## नववी पंचवार्षिक योजना

कालावधी - १९९७ ते २००२.
मुख्य भर - कृषी व ग्रामीण विकास.
घोषवाक्य - सामाजिक न्याय व समानतेसह आर्थिक वाढ.
१५ वर्षाच्या दिर्घकालीन योजनेचा भाग.
खालील ४ बाबींचा विशेषत्वाने विचार.
① राहणीमानाचा दर्जा ③ प्रादेशिक समतोल
② उत्पादक्षम रोजगारनिर्मिती ④ स्वावलंबन
प्रस्तावित खर्च - ८,५९,२०० कोटी. वास्तविक - ९४१०४० कोटी.

उद्दिष्ट्ये. १) कृषी व ग्रामीण विकास- अग्रक्रम.
२) मुलभूत सेवा
३) शाश्वत विकास
४) स्त्रियांचे सबलीकरण

घटनाक्रम: १) एप्रिल १९९७ - भारताचे दुसरे पंचवार्षिक परकीय धोरण.
२) १९९८ - राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम (National Highways Development Programme)
३) १९९७ - नवरत्न व मिनिरत्न श्रृंखला.
४) १९९८ - SBI ने Resurgent India Bond योजना. परदेशस्थ भारतीयांना गुंतवणूकीसाठी आमंत्रित करण्यात आले.
५) फेब्रु २००० - राष्ट्रीय लोकसंख्या धोरण - २८ जुलै २००० लोकसंख्या स्थिरीकरण निधी स्थापना.
११ मे २००० - लोकसंख्या आयोगाची स्थापना..
६) जून ९९ मध्ये राष्ट्रीय कृषी विमा योजना (NIAS)
७) २०००-०१- वार्षिक आयात निर्यात धोरणात सर्वप्रथम विशेष आर्थिक क्षेत्राची (SEZ)
८) एप्रिल २००० पासून CENVAT - तर जून २००० पासून FEMA

योजना:
① स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना डिसें १९९७
② अन्नपूर्णा योजना - मार्च १९९९ - पेन्शन न मिळणाऱ्यांना ज्येष्ठांना १० कि. धान्य.
③ स्वर्णजयंती ग्रामीण रोजगार योजना - मार्च १९९९
④ समग्र आवास योजना - एप्रिल १९९९ - आवास, स्वच्छता व पेयजल केंद्रित योजना.
⑤ जवाहर ग्राम समृध्दी योजना - (JGSY) - २०००
⑥ अंत्योदय अन्न योजना - २००० - २५ kg धान्य गहू - २रु तांदूळ ३रु
⑦ प्रधानमंत्री ग्राम सडक योजना - २५ डिसें २०००

Scanned by CamScanner

⑧ प्रधानमंत्री ग्रामोदय योजना - २०००-०१
⑨ संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (SGRY) - २५ सप्टे २००१
⑩ वाल्मिकी आंबेडकर आवास योजना - सप्टे २००१
⑪ सर्व शिक्षा अभियान (२००१)

मुल्यमापन : 1) वाढीच्या दराचे लक्ष्य पूर्ण नाही - ६.५/५.५२
कारणे - अ) कृषी क्षेत्राच्या वाढीचा दर कमी
ब) ओरिसाचे वादळ
क) गुजरात भूकंप
ड) कारगील युद्ध

2) बचत दर व गुंतवणूकीच्या दराचे लक्ष्य गाठण्यात अपयश
बचत दर - लक्ष्य - २६.३ → साध्य २३.३% GDP
गुंतवणूक दर - " - २८.३ → २४.२% GDP.

## दहावी पंचवार्षिक योजना

कालावधी - २००२ ते २००७. प्रस्तावित खर्च - १५,२५,६३९ कोटी प्रत्यक्षात १६,१८,४६० को
दहाव्या योजनेची लक्ष्ये : → GDP च्या वाढीच्या दराचे लक्ष्य - आठ टक्के.
→ BPL चे प्रमाण २००७ पर्यंत २१% व २०१२ पर्यंत ११% पर्यंत कमी
→ २००१ ते २०११ लोकसंख्या वाढीचा दर १६.२% पर्यंत कमी करणे.
→ साक्षरतेचे प्रमाण २००७ पर्यंत ७५% पर्यंत २०१२ पर्यंत ८०% पर्यंत
→ बालमृत्यू प्रमाण (IMR) २००७ पर्यंत ४५%, २०१२ पर्यंत २८
→ मातामृत्यू प्रमाण (MMR) २००७ — २ व " — १ पर्यंत
→ जंगल व्याप्त प्रदेशाचे प्रमाण २००७ - २५% व २०१२ - ३३%
→ २०१२ पर्यंत खेड्यांना शाश्वत जल पुरवठा.
→ २००७ पर्यंत मोठ्या प्रदुषित नद्यांची स्वच्छता.

सुरु करण्यात आलेल्या योजना :

① सामाजिक सुरक्षा प्रायोगिक योजना - (Social Security pilot scheme)
जाने २००४ - असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा यो
उदा - पेन्शन, विमा, आरोग्य.

② राष्ट्रीय कामासाठी अन्न योजना : - (National Food for work Programme
१४ नोव्हे २००४ - पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी अलूर गावातून
(आंध्रप्र) योजना सुरु.

③ मजुरी रोजगाराबाबतची (Wage Employment) - २००४
मात्र २००६ पासून राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेत.

④ राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NAREGS)
कार्यान्वित २००६ फेब्रु २.

Scanned by CamScanner

⑥ जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय शहरी पुनरुत्थान अभियान (Jawaharlal Nehru National Urban Renewal Mission - JNNURM.

३ डिसें २००५. — कालावधी ७ वर्षे. २००५-०६ ते २०११-१२

चार प्रमुख घटकांपैकी ~~२ मु~~ २ मुलभूत गरजांशी संबंधित.

① ६५ निवडक शहरांसाठी 'शहरी गरिबांकरिता मुलभूत सुविधा'

② छोट्या शहरांसाठी 'एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम'.

फलनिष्पत्ती :

1) सरासरी वार्षिक वृद्धी दर - ७.६ (सरासरी) - लक्ष्यापर्यंत सफलसिद्ध.

2) उद्योग व सेवा क्षेत्रात लक्ष्य दर प्राप्त झाला ९.९% - ९.९

९.४ — ९.३७. मात्र

कृषीमध्ये लक्ष्य ४% व प्राप्त २.१३%.

3) गुंतवणूक दर लक्ष्य २८.४१ व प्राप्त ३०.८%.

4) बचत दर लक्ष्य २३.३१ व प्राप्त २६.६%.

## अकरावी पंचवार्षिक योजना

कालावधी २००७ ते २०१२.

उद्दिष्ट्ये : 1) GDP च्या वाढीचे वार्षिक सरासरी ९% लक्ष्य.

2) समावेशी वाढीचे लक्ष्य.

११ व्या योजनेची दृष्टी. :

* वेगवान वृद्धी, दारिद्र्य कमी करणे, रोजगार संधी वाढविणे.
* गरिबांसाठी आरोग्यनागरीकरण.
* शिक्षण व कौशल्ये विकास
* पर्यावरणीय शाश्वतता.
* लिंगविषयक असमानतेत घट
* शासनप्रणालीमध्ये सुधारणा.

प्रस्तावित खर्च : ३६,४४,७१८ कोटी (केंद्राच्या हिस्सा - ५९.२% राज्यांचा ४०.८%.)

(१० व्या योजनेपेक्षा १२५ टक्क्यांनी जास्त)

GDP व दरडोई GDP ⇒ ९% लक्ष्य = (दरवर्षी ७.५% वाढ) मध्यावधी लक्ष्य ८.१% वर आणले

क्षेत्रीय वाढ ⇒ 3) कृषी ४%.

उद्योग १०.११%.

सेवा ९.११%.

बचत दराचे लक्ष्य ⇒ ३४.८%. (घरगुती २१.८%, कार्पोरेट ८.५%. सार्वजनिक - ४.५%)

Scanned by CamScanner

गुंतवणूक दराचे लक्ष्य - ३६.७% (खाजगी - २८.७%. सार्वजनिक ८%)

## साधनांची क्षेत्रीय विभागणी :

| | १० व्या | ११ व्या |
|---|---|---|
| कृषी व जलसिंचन | २०.२% | १८.५% |
| संचार क्षेत्र | ५.१% | २.६% |
| वाहतूक | १६.३% | १३.७% |
| सामाजिक सेवा | २७% | ३०.३% (१९.५% शिक्षण, ५% आरोग्य, ४.२% शहरी वि.) |
| ऊर्जा | २३.४% | २३.४% |

बीज विकास : - ७८,५७७ MW बीज निर्मितीचे लक्ष्य (प्रमाण)
६३.३% औष्णिक
१७.१% जलविद्युत
३.७% अणुविद्युत

## रोजगार निर्मिती :

| | १० व्या | ११ व्या |
|---|---|---|
| लक्ष्य - | ५ कोटी | ५.८ कोटी (पैकी २.४ - उद्योग, ३.४ - सेवा) |
| साध्य | ४.७ कोटी | |

↓ दारिद्र्याचे प्रमाण १०% कमी करणे

## व्यवहारतोल (Balance of Payments)

निर्यातीचे प्रमाण GDP च्या तुलनेत २००६-७ = १३.९५%
२०११-१२ - २२.५%

आयातीचा वार्षिक वाढीचा दर - २३%
प्रमाण २००६-०७ = २१%
२०११-१२ - ३८.५%

## १२ वी पंचवार्षिक योजना

कालावधी - २०१२ ते २०१७
घोषवाक्य - जलद, शाश्वत व अधिक समावेशी वृद्धी.
९% आर्थिक वृद्धीचा प्रस्ताव.

प्रमुख लक्ष्ये i) वार्षिक वाढीचे लक्ष्य सरासरी ८%.
कृषी ४%
उद्योग ७.६%
सेवा ९%.

Scanned by CamScanner

२) बचत दर : ३३.६ % of GDP
३) गुंतवणूक दर : ३८.८ % —"—
४) उपभोग खर्च - ६१.२ % —"—
५) वस्तू निर्यात - १६ % —"—
६) वस्तू आयात - २५.२ % —"—
७) वस्तू व्यापार तूट - -९.२% —"—
८) सेवा निर्यात - ३.५ % —"—

**क्षेत्रीय लक्ष्ये** :-
1) दारिद्र्य - १०% नी कमी.
2) गैर कृषी क्षेत्रात ५० दशलक्ष नवीन रोजगार - नेतृत्त्यांना कौशल्य प्रमाणपत्र.
3) सरासरी शालेय वर्षे उपस्थिती वाढविणे.
4) IMR - 25 पर्यंत.
5) MMR - 1% पर्यंत कमी करणे.
6) बाल लिंग गुणोत्तर - ९५० पर्यंत वाढविणे.
7) जनन दर २.१%.
8) पायाभूत क्षेत्रातील गुंतवणूक - ९% GDP.
9) सिंचित क्षेत्राचे प्रमाण ९० दशलक्ष हेक्टरवरून १०३ दशलक्ष पर्यंत
10) सर्व गावांना वीज - गळतीचे प्रमाण २०% पर्यंत कमी.
11) सर्व गावे बारमाही रस्त्यांनी जोडणे
12) पश्चिमी व पूर्वीय फ्रेट कॉरीडॉर पूर्ण करणे.
13) ५०% ग्रामीण जनतेला ५५ लीटर/प्रति दिन पाणी - नळ
५०% ग्रामपंचायती - निर्मित
14) हरित क्षेत्राचे प्रमाण दरवर्षी १ दशलक्ष हेक्टरने वाढविणे.
15) 30,000 MW अक्षय ऊर्जा क्षमता दरवर्षी निर्मिती.

**खर्चाची विभागणी** :
प्रस्तावित - ७६,६९,८०७ कोटी. (केंद्र ५६.५%. राज्ये व केंद्रशासित प्र. ४३.५)
खर्चाचा सर्वाधिक हिस्सा : सामाजिक सेवा क्षेत्र : ३४.७४%.
ऊर्जा - १८.७५%.
कृषी - १४.२५
वाहतूक - १५.७

## महत्त्वाची माहिती :

① कृषी क्षेत्र → सर्वाधिक खर्च – ३१.१% → १ ली योजना.

② — " — सर्वात कमी खर्च – १८% → ११ वी — " —

③ अन्नधान्य उत्पादन लक्ष्य केवळ १ल्या व १०व्या योजनेत साध्य.

④ — " — मागील योजनेपेक्षा कमी – केवळ ३ऱ्या योजनेबाबत

⑤ १०व्या योजनेत पीक उत्पादन, कृषी क्षेत्र वाढ दर – लक्ष्ये निश्चित केली नाही.

⑥ ५% पेक्षा अधिक वार्षिक सरासरी आर्थिक वृद्धी दर – ६ व्या योजनेपासून

६% — " — — " — ८ व्या — " —

७% — " — — " — १० व्या — " —

८.२ वृद्धी दर – ११व्या योजनेत साध्य.

⑦ चलनवाढीचा दर कमी होणे – ही धारणा केवळ १ल्या योजनेत

→ पहिल्या ३ योजनेत वाढीच्या दराचे लक्ष्य = NNP च्या स्वरूपात

→ ४ थ्या — " — NDP — " —

→ त्यानंतर — " — GDP — " —

## नीती आयोग

⇒ २०१४ – स्थापना – मोदी सरकारने नियोजन आयोग बरखास्त करून नीती आयोग स्थापन केला. (NITI – National Institution for Transforming India

⇒ २९ मे २०१४ – स्वतंत्र मूल्यांकन कार्यालयाची – स्वतंत्र नियंत्रक आयोग स्थापन करण्याची शिफारस – पंतप्रधानांना

⇒ १३ ऑ. २०१४ – १५ मार्च १९५० चा सरकारी अधिनियम रद्द करण्यास मान्यता

⇒ १५ ऑ. २०१४ – संस्था स्थापन करण्याची पंतप्रधानांची घोषणा.

⇒ १ जाने २०१५ → सरकारी अधिनियमाने नीती आयोगाची असंवैधानिक व अवैधानिक संस्था म्हणून स्थापना. ( थिंक टँक म्हणून – केंद्र व राज्यांना

⇒ ८ फेब्रु. २०१५ – नीती आयोगाची पहिली प्रशासकीय बैठक.

रचना: ① पूर्णकालिक संघटनात्मक यंत्रणा:

② प्रशासक परिषद

③ प्रादेशिक परिषदा.

Scanned by CamScanner

1) पूर्णकालिक संघटनात्मक यंत्रणा :- * अध्यक्ष - पंतप्रधान - पदसिद्ध
* उपाध्यक्ष - पंतप्रधानांमार्फत नेमणूक
* पूर्णकालिक सदस्य - पंतप्रधानांमार्फत नेमणूक
* अंशकालिक - जास्तीत जास्त २ - प्रमुख विद्यापीठे, संशोधन संस्था इ. मधून
* पदसिद्ध सदस्य - केंद्रिय मंत्रिमंडळातील - जास्तीत जास्त ४ - पंतप्रधानांमार्फत
* आमंत्रित - तज्ञ व विशेषज्ञ - पंतप्रधानांमार्फत
* मुख्य कार्यकारी अधिकारी : भारत सरकारच्या सचिव दर्जाचा अधिकारी - पंतप्रधानांमार्फत
* सचिवालय.

प्रशासक परिषद :
* पंतप्रधान - अध्यक्ष
* उपाध्यक्ष
* पूर्णकालिक सदस्य
* पदसिद्ध सदस्य
* घटक राज्यांचे मुख्यमंत्री (दिल्ली व पुदुच्चेरी सहित)
* केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल
* आमंत्रित सदस्य.

प्रादेशिक परिषदा
* एकापेक्षा अधिक राज्यांना प्रभावित करणारे मुद्दे व आपत्कालिन स्थिती हाताळण्यासाठी - परिषदा स्थापन.
* निश्चित काळासाठी
* संयुक्त अध्यक्षपद - प्रदेशातील राज्यांपैकी एका राज्याचे मुख्यमंत्री (क्रमशः) व संबंधित विषयाचा केंद्रिय मंत्री.

3) निती आयोगाचे सध्याचे सदस्य :
अध्यक्ष - श्री नरेंद्र मोदी
उपाध्यक्ष - श्री. राजीव कुमार
CEO - श्री अमिताभ कांत
पूर्णकालिन सदस्य - i) रमेश चंद - (कृषी तज्ञ)
ii) व्ही. के. सारस्वत - (DRDO चे भूतपूर्व अध्यक्ष)
iii) श्री. विवेक देबरॉय - (अर्थतज्ञ)
पदसिद्ध केंद्रिय मंत्री : 1) राजनाथ सिंह 2) अरुण जेटली 3) सुरेश प्रभू 4) राधामोहन सिंग.
आमंत्रित - 1) नितिन गडकरी 2) थावरचंद गेहलोत 3) स्मृती इराणी.

Scanned by CamScanner

कार्ये: ① राज्यांच्या सक्रीय सहभागाद्वारे राष्ट्रीय उद्दिष्टांच्या संदर्भात राष्ट्रीय विकासाचे अग्र
क्षेत्रे व डावपेच याबाबतचा सामाईक दृष्टीकोन विकसित करणे.
② सहकारात्मक संघराज्यीय व्यवस्थेस प्रोत्साहन देणे.
③ ग्रामीण स्तरावर योजना तयार करण्यासाठी यंत्रणा विकसित करणे.
④ समाजातील वंचित घटकांकडे विशेष लक्ष पुरविणे.
⑤ डावपेचात्मक व दिर्घकालीन योजनांचा आराखडा तयार करणे.
⑥ उद्योजकीय आधार व्यवस्था निर्माण करणे
⑦ तंत्रज्ञान दर्जावर्धन आणि क्षमता बांधणीवर लक्ष देणे.

* १५ वर्षाचे व्हीजन डॉक्युमेंट.

१५ वर्षाचे व्हीजन: कालावधी २०१७-१८ पासून २०३०-३१
साधारणत: SDGs शी समांतर
पायाभूत संरचना, वाणिज्य, शिक्षण, आरोग्य. दीर्घकालीन वि

७ वर्षासाठी डावपेच: दिर्घकालीन व्हीजनचे रुपांतर अंमलक्षम धोरणात करण्यासा
२०१७-१८ ते २०२३-२४ – ७ वर्षे

३ वर्षाची कृती योजना: कालावधी २०१७-१८ ते २०१९-२०.

---

## सहस्त्रक विकास लक्ष्ये – MDGs.

(Millenium Development Goals)

– सप्टें २००० मध्ये संयुक्त राष्ट्र सहस्त्रक परिषदे मध्ये हा एक रोडमॅप तयार केला.

उद्देश – जगातून गरिबी, भूक, रोग, निरक्षरता, पर्यावरण हास, स्त्री-पुरुष असमानता इ. चे उच्चा

→ सुरुवातीला 2000 – ८ ध्येये १८ लक्ष्ये ४८ निर्धारिके
२००३ – ८ ध्येये १८ लक्ष्ये ५३ निर्धारिके
२००८ – ८ ध्येये २१ लक्ष्ये ६० निर्धारिके

} कालावधी १ जाने २००१ ते ३१ डिसें. २०१५ = १५ वर्षे

आठ ध्येये खालीलप्रमाणे:

① अति दारिद्र्य व भूकेचे निर्मुलन. ① प्रतिदिन १ डॉलर पेक्षा उत्पन्न असणाऱ्या लोकांचे प्रमाण निम्म्याने कमी करणे.
② भूकेने पिडीत लोकांचे प्रमाण निम्म्याने कमी करणे.

② सार्वत्रिक प्राथ. शिक्षण. ① सर्व मुले व मुली प्राथ. शिक्षण पूर्ण करतील.

ध्येय ३ - जेंडर समानता: ① २००५ पर्यंत प्राथ. व माध्य. शिक्षणातील नर २०१५ पर्यंत सर्व स्तरातील जेंडर असमानता नष्ट करणे.

ध्येय ४. बाल मर्त्यता: ① ५ वर्षाखालील बालकांमधील मर्त्यतेचे प्रमाण २/३ ने कमी करणे

ध्येय ५ माता आरोग्य ① माता मर्त्यतेचे प्रमाण ३/४ ने कमी करणे.

ध्येय ६ - एड्स/मलेरिया व इतर रोगांशी सामना: ① HIV/AIDS चा प्रसार थांबविणे.
② मलेरिया व इतर प्रमुख रोगांचा प्रादुर्भाव थांबवणे.

ध्येय-७. पर्यावरण: ① सुरक्षित पेयजल-उपलब्धता नसणाऱ्यांचे प्रमाण निम्म्याने कमी करणे
② २०२० पर्यंत १०० दशलक्ष झोपडपट्टी वासियांच्या जीवनात सुधारणा

ध्येय-८- विकासासाठी जागतिक भागिदारी: ① खुला व्यापार, वित्तीय व्यवस्थेचा विकास.
② गरिब देशांना कर्जमाफी
③ लहान व भूवेष्टित देशांच्या गरजांकडे लक्ष
④ औषध कंपन्यांशी करार - परवडण्याजोगी औषधे उपलब्ध करणे.

## शाश्वत विकास लक्ष्ये.
## Sustainable Development Goals - SDG's.

→ MDG's चा कालखंड २०१५ मध्ये संपला.
→ बहुतेक देशांनी लक्ष्ये पूर्ण केली नाही-
→ म्हणून संयुक्त राष्ट्रांनी २०१६ ते २०३० - १५ वर्षे कालावधीसाठी SDG's ची घोषणा.
२५-२७ सप्टें. २०१५- न्यूयॉर्क येथे भरलेल्या आम सभेच्या 'संयुक्त राष्ट्र शाश्वत विकास शिखर परिषदेत' 'शाश्वत विकासासाठी २०३० अजेंडा' स्विकारण्यात आला.

वैशिष्ट्ये:
1) २०१२ साली भरलेल्या रिओ +२० या युनोच्या 'The Future we want' या अहवालात SDG's ची घोषणा - त्यासाठी कार्यगट
2) २५ सप्टें- स्विकार
3) १७ ध्येये १६९ लक्ष्ये
4) कालावधी १ जाने २०१६ ते ३१ डिसें २०३०.
5) जगातील सर्व राष्ट्रांना लागू

- MDG's व SDG's तुलना.
- MDG's केवळ विकसनशील देशांसाठी
- MDG's पुरेशाचे दारिद्र्य निर्मूलनाशी संबंधित.

Scanned by CamScanner

iii) SDGs ची लक्ष्ये व्यापक.

१७ लक्ष्ये.

१) दारिद्र्य नष्ट करणे
२) भूक नष्ट करणे.
३) चांगले आरोग्य व सुस्थिती
४) गुणवत्तापूर्ण शिक्षण
५) लिंग समानता
६) स्वच्छ पेयजल व स्वच्छता
७) चांगली कार्यस्थिती व आर्थिक वाढ
८) उद्योग, पायाभूत संरचना
९) विषमता कमी करणे
१०) शाश्वत शहरे व समुदाय
११) परवडण्याजोगी स्वच्छ ऊर्जा
१२) जबाबदार उपभोग व उत्पादन
१३) हवामान कृती
१४) पाण्याखालील जीवन
१५) जमीनीवरील जीवन
१६) शांतता, न्याय व मजबूत संस्था
१७) लक्ष्यपूर्तीसाठी भागीदारी

Scanned by CamScanner